बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस क्र.

नोटीस

दि. १६/११/२०२६

१) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ याकरिता SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT/ SEBC/ OPEN-EWS/OPEN-EBC शिष्यवृत्ती/फ्रिशीपची/ईबीसी- SEBC/अंपग-शिष्यवृत्ती/अनाथ शिष्यवृत्ती वगैरे इत्यादी) महाडीबीटी पोर्टल २.० वरून नवीन /नुतनीकरणाचे अर्ज भरणे बाबत

२) OBC/SBC/VJ/DT/NT प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रूपये २.५ लाख मर्यादेच्या आत आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी एनएसपी पोर्टलवरून अर्ज भरणेबाबत.

१) महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज भरणेबाबत-

या नोटीसव्दारे SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT/ SEBC/ OPEN-EWS/OPEN-EBC/ORPHAN या प्रवर्गातील केंद्र व राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे सवलतीस पात्र असणाऱ्या सर्व शिष्यवृत्ती/फ्रिशीपधारक (नवीन/नुतनीकरण) विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, महाविद्यालयाने शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी प्रवर्गनिहाय सवलत लागू करून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ वर्षाकरिता प्रथम/व्दितीय/तृतीय/अंतिम वर्ष बी.टेक या अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिलेला आहे. विद्यार्थ्यांना लागू करण्यात आलेल्या सवलतीच्या (SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT/ SEBC शिष्यवृत्ती/फ्रिशीपची/ईबीसी/अंपग-शिष्यवृत्ती/अनाथ शिष्यवृत्ती वगैरे इत्यादी) रक्कमेची प्रतिपूर्ती शासनाकडून महाविद्यालयास वेळेत होणे आवश्यक व जरूरीचे आहे, त्याकरिता विद्यार्थ्यांनी त्यांचे वार्षिक उत्पन्न व प्रवर्गानुसार **https://mahadbt2.maharashtra.gov.in/** या नव्याने सुरू करण्यात आलेल्या संकेतस्थळावरून योग्य ती योजना निवड करून ऑनलाईन अर्ज भरणे अत्यंत आवश्यक व जरूरीचे आहे याची नोंद घ्यावी. जे विद्यार्थी त्यास लागू असणाऱ्या योजनेचा ऑनलाईन अर्ज भरण्याची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करणार नाहीत त्याची सवलत रद्द होईल व अशा विद्यार्थ्यांना खुल्या (ओपन) प्रवर्गाप्रमाणे शुल्क भरावे लागू शकते याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

OBC/SBC/VJ/DT/NT/ च्या प्रवर्गातून प्रथम व थेट व्दितीय वर्ष २०२६-२७ (उत्पन्न रूपये २.५ लाख पेक्षा जास्त) व त्यापूर्वीच्या व्दितीय/तृतीय/अंतिम वर्षाच्या सर्व शिकत असलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांनी **https://mahadbt2.maharashtra.gov.in/** या पोर्टलवरून सोबत जोडलेल्या माहिती प्रमाणेच त्यास लागू असणाऱ्या योजनेकरिता ऑनलाईन अर्ज करावयाचा आहे.

२) एनएसपी पोर्टलवरून अर्ज भरणेबाबत-

OBC/SBC/VJ/DT/NT/ च्या प्रवर्गातून प्रथम व थेट व्दितीय वर्ष २०२६-२७ करिता प्रवेशित असणाऱ्या व ज्यांच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रूपये २.५ लाख मर्यादेच्या आत आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी या एनएसपी पोर्टल- **https://scholarships.gov.in/** या पोर्टलवरून PM-YASASVI: Post-Matric Scholarship for OBC, EBC and DNT - MAHARASHTRA या योजनेकरिता ऑनलाईन अर्ज करावयाचा आहे.

टिप- विद्यार्थ्यांनी अर्ज भरते वेळी Current Course Information मध्ये खालील दिलेली माहिती न चुकता भरावी.

- College name / School Name- **Bansilal Ramnath Agarawal Charitable Trust's Vishwakarma Institute of Technology, Bibwewadi, Pune**
- Upload CAP ID / Merit Percentage Document/CLAT Related Document : - **Upload Admission Confirmation Letter (CAP –Blue Letter issued by College at the time of Admission)**
- Fees paid – **Amount Zero (0) and upload only college fees paid receipt 26-27 (Bonifice certificate is not acceptable)**

-: महत्वाची सूचना :-

१) विद्यार्थ्यांनी सोबत जोडलेल्या महाडीबीटी २.० वरती ऑनलाईन अर्ज भरणेबाबत माहिती जोडलेली आहे त्याप्रमाणेच विद्यार्थ्यांनी कार्यवाही करणे आवश्यक व जरूरीचे आहे. जर योजना, माहिती, कागदपत्रे चुकीची अथवा खोटी असल्यामुळे अर्ज सेंड बॅक / रिजेक्ट झाला तर त्यास विद्यार्थी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

२) इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.८३/शिक्षण, दि. २० जून २०२५ तसेच शुध्दीपत्रक जा.क्र.ससंइमाबकपुणे/भासशि/महाडीबीटी/अगेन्ट कॅप/२०२५-२६/२२० दि. २०.०२.२०२६ या परिपत्रकान्वये संस्थास्तरावरील /व्यवस्थापन कोटातील प्रवेशित OBC/SBC/VJ/DT/NT/ SEBC या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती अर्ज करता येणार नाही याची नोंद घ्यावी. (सदर निर्णयामध्ये शासनाकडून बदल झाल्यास विद्यार्थ्यांना याबाबत सूचित केले जाईल याची नोंद घ्यावी.)

३) १००% शिक्षण शुल्कामध्ये सवलती लागू असणाऱ्या मुलींनी सोबत जोडलेल्या योजनांच्या तक्त्यानुसार योजनांना अर्ज करावयाचा आहे याची नोंद घ्यावी.

४) शासन नियमानुसार पोर्टल बदल/स्कीम बदल झाल्यास त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना कार्यवाही/अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी लागेल याची नोंद घ्यावी.

५) विद्यार्थ्यांने केंद्र अथवा राज्य यांनी लागू केलेल्या एकाच योजनेकरिता अर्ज भरणे आवश्यक आहे दोन्ही पोर्टलवरून विद्यार्थ्यांना अर्ज भरता येणार नाही.

संचालक
विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी,
पुणे-३७

प्रत: १) सर्व विभाग प्रमुखांना माहितीसाठी, २) सर्व नोटीसबोर्डकरिता, ३) सिस्टीम विभाग प्रमुख यांना माहितीकरिता व विभागाचे नोटीस बोर्डकरिता प्रकाशित करणेकामी.